International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
September 2014 Issue-III, Volume-II
Online Journal ISSN No. 2347-8268

# ग्रंथालयात तंत्रज्ञानाचे महत्व

**प्रा. पौर्णिमा ह. राहांगडाले**
ग्रंथपाल
कला, वाणिज्य, महा. पे. पं. जवाहरनगर.

आजच्या आधुनिक ग्रंथालयाच्या उपयोगासाठी तांत्रिक दृष्टया इंटरनेटचा वापर ग्रंथालयीन कामासाठी सुद्धा होतो. त्याआधी इंटरनेटचा सुरवातीचा इतिहास पाहीला असता त्यावेळेस इंटरनेटचा उपयोग संरक्षणासंबंधी गुप्त माहीती हाताळण्यासाठी, संशोधनासाठी किंवा शास्त्रीय माहीतीची देवणघेवाण करण्यासाठीच करण्यात आलेला असावा. कालांतराने इंटरनेट फक्त उच्चभ्रु किंवा श्रीमंत व्यक्तींसाठी उद्योगपततींसाठी किंवा व्यापाऱ्यांसाठीच किंवा त्यांच्या सारख्यांनाच परवडण्यासारखे होते. परंतु आज ती समजुत चुकीची ठरली आहे. आज इंटरनेट प्रत्येक वयोगटासाठी उपयोगी साधन बनले आहे. संगणकाचे शिक्षण घेवुन इंटरनेट आपले दैनंदिन जिवनात परदेशातील शाळेकरी मुलांप्रमाणे इंटरनेटचा वापर मोबाईलवर पाहता येवु शकत आहे. माहीती तंत्रज्ञानाचा साक्षात्कार ग्रंथलयशास्त्र व माहीती – तंत्रज्ञान हे एकमेकांचे हात धरून चालणारे समीकरण आहे. इंटरनेटचा ग्रंथालयातील वापरासाठी महत्वाचे स्थान आहे. ग्रंथालयातील प्रत्येक विभागाच्या कामात इंटरनेटच्या कामात इंटरनेटचा वापर होत आहे..

इंटरनेट म्हणजे जगातील लाखो संगणकानी मिळुन तयार झालेले जाळे होय. याची थोडक्यात व्याख्या म्हणजे अशी की '' माहीतीच्या साठयांचे जाळे'' या जाळयांचे कोणीही मालक नाही. फक्त काही संस्था त्यांच्या तांत्रिक नियंत्रणाचे काम पाहतात. ज्याच्या आधारे इंटरनेट चालते ती दळण वळण माध्यमे त्यांचे स्वामित्व मात्र काही खाजगी तसेच निमसरकारी संस्थेकडे आहे.

## इंटरनेटची तांत्रिक पार्श्वभुमी

इंटरनेटसाठी संगणक एकमेकांशी संवाद साधण्यासाठी विशिष्ट अशा तत्वप्रणालीचा उपयोग करतात त्याला (Transmissin Control Protocol) इंटरनेट तत्वप्रणाली ( Internet Protocol/ Suit) असे म्हटले जाते. टी. सी. पी./आय.पी (Tcp/IP) यामुळे इंटरनेट दळणवळण सहज शक्य होते.

WWW म्हणजे कुठल्याही प्रोटोकॉल सिस्टीमशी जोडता येऊ शकेल अशी आज्ञावलीत WWW ही एक Service System आहे. या प्रोटोकॉलच्या प्रकारात E-mail, ,Q-Vh-ih-Ghopers, Telnet, Usenet,News,Group चाट इत्यादी प्रकार असुन या शिवाय वर्ल्ड वाईड वेब चा स्व्तःचा प्रोटोकॉल म्हणजे http (Hypertext Transfer Protocol आहे.



A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

इंटरनेटचा दैनंदीन ग्रंथालयीन कामात उपयोग ग्रंथालयात इंटरनेटचा प्रथम दर्शनी उपयोग ग्रंथालयाची वेबसाईट तालीका (OPAC) तसेच डिजीटल स्तोत्रांचे ग्रंथालयात उपयोग वाचकांना आपल्या आवडीचे साहीत्य या OPAC' च्या माध्यमाने मिळु शकते. याबरोबरच उपार्जनाच्या कामात नवीन ग्रंथ प्रकाशनाचा संबंधीत माहीती. ग्रंथाची उपलब्धता त्यांची किंमत , त्यांचे वितरक तसेच ग्रंथखरेदी संबंधी माहीती परदेशी प्रकाशकांचे प्रकाशित झालेल्या ग्रंथाबद्दल माहीती मिळत असते. ग्रंथसंस्कार /उपस्कर कामामध्ये इंटरनेटचा वापर गंथोपस्कार प्रक्रीयामध्ये वर्गीकरण तालीकीकरण, विषय मथडे ( Subject Title) ही सर्व कामे करावी लागतात.तालीकीकरणाचे नमुने उपलब्ध करण्यासाठी वेबसाईटचा समावेश होतो. तालीकांचे सुचिबद्ध घटक, सुधारीत आवृत्तीचा शोध घेण्यास उपयुक्त साधन आहे. ग्रंथालयाच्या देवघेव कामात इंटरनेटचा वापर आंतरग्रंथालयीन देवघेवीसाठी महत्वपुर्ण घटक म्हणुन मानला जातो. ग्रंथालयाच्या इंटरनेटवरील संकेतस्थळाचा वापर करून साहीत्यासंबंधी माहीती मिळविता येते. ग्रंथालया संबंधी ग्रंथपाल सभासदत्व, नुतनीकरणग्रंथ परत न आल्यास स्मरणपत्रे, देवघेव विभागाकडुन प्रसारीत केलेल्या सुचना, बातम्या कार्यक्रमाची पत्रके इ. गोष्टी इंटरनेट या तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन करण्यात येते.

1) ग्रंथालयात उपार्जन कामात इंटरनेट तंत्रज्ञानाचे महत्व ग्रंथालयातउपार्जन प्रक्रियेमध्ये नविन ग्रंथ, प्रकाषनासंबंधीत माहीती, ग्रंथाची उपलब्धता, त्यांची किंमत त्यांचे वितरक तसेच ग्रंथखरेदीसाठी माहीती वारंवार उपयोगी पडत असते. पदरेशी प्रकाशीत ग्रंथाबद्दल यांची गरज असते. ही आवश्यकता लक्षात घेवून उपार्जनाच्या शोधकार्यात वेबसाईटचा जास्तीत जास्त उपयोग करता येतो. प्रत्येक वेळी गरज लक्षात घेता'बुक्स इन प्रिंट' सारखी संदर्भसाधने इलेक्ट्रानीक माध्यमात वार्षिक वर्गणी भरून इंटरनेटच्या माध्यमातुन वापरता येतात. उपार्जनाच्या कामात प्रकाशकांच्या शोधासाठी काही संकेत स्थळे उदा. प्रकाशकांच्या वेबसाईटच्या wwww.amazon.com, www.bansandoble.com,www.bookfinder.com

**2) ग्रंथ संस्कार /उपस्कार कामामध्ये इंटरनेट तंत्रज्ञानाचे महत्व :–**

ग्रंथोपस्कार प्रक्रीयेमध्ये वर्गीकरण (Classification) तालीकीकरण ( Cataloguing) तसेच विषय मथडे (Subject Title) या सर्वांचा समावेष होत असतो. वर्गीकरण व तालीकीकरणाची स्थानिक गरज लक्षात घेवुन व सतत मार्गदर्शनावर माहीतीची आवश्यकता भासत असते. म्हणुन या सर्व कार्यासाठी इंटरनेटचा वापर आवश्यकता भासत असते. म्हणुन या सर्व कार्यासाठी इंटरनेटचा वापर आवश्यक बाब ठरते. OCLC या ग्रंथालय नेटवर्कचा उपयोग यासाठी चांगल्या प्रकाराने होऊ

शकतो. ज्यामध्ये ग्रंथाबद्दलची पुर्वलक्ष्यी, नुतनीकरण तसेच तालीकीचे सुचिबद्ध घटक डाऊनलोड पद्धतीने वारंवार उपयोगात आणता येते.

**3) देवघेव कामामध्ये इंटरनेट तंत्राचे महत्व :—**

देव घेव संबंधी कामामध्ये इंटरनेट तंत्रज्ञानाचा वापर करून आंतरग्रंथालयीन Interlibrary loan साठी करता येते. असलेल्या ग्रंथ व ग्रंथेत्तर साहीत्यांची उपलब्धता इतर स्थानिक व संबंधित ग्रंथालयावरून उपलब्ध संकेतस्थळांचा उपयोग करून शोधता येते. व आवश्यक असणारी माहीती पत्रे, इमेलच्या व्दारे पाठवुन आंतरग्रंथालयीन पद्धतीचा वापर खुप चांगल्या प्रकारे वाचकास होवु शकतो.

**4) इंटरनेट तंत्रज्ञानाचा नियतकालीक विभागात महत्व :—**

ग्रंथालयात नियतकालीका संबंधी सुचिबद्ध माहीती बहुतेक नियतकालीके छापील आवृत्तीबरोबर डिजीटल माध्यमातून म्हणजेच इ—जर्नलच्या स्वरूपात उपलब्ध असतात. याचा वापर वाचक इ—जर्नलस इंटरनेटच्या माध्यमातून असतो. विशेषतः परदेशी नियतकालजीकांची माहीती उलरिच (ULRICH) या संदर्भसाधनाच्या संकेत स्थळामधुन मिळविली जाते.

**5) संदर्भ व माहीती सेवेत इंटरनेट तंत्रज्ञानाचे महत्व :—**

ग्रंथालयाच्या सेवेत सिलेक्टिव्ह डिसमिनेशन इन्फॉर्मेशन SDI सारख्या व्यक्तिकेंद्रात सेवा विभाग व प्रोजेक्ट केंद्रित माहीती सेवा इंटरनेटचा आधार घेण्यात येतो. या विभागाशी निगडीत डिजिटल ग्रंथालय अंतर्गत आधुनिक माहीती स्तोत्रांची सुची बनवून वाचकांसाठी तयार करण्याचे मुख्य काम करण्यात येते. यात फुलटेस्क सेवा वाचकांसाठी उपलब्ध करून दिली जाते. या फुलस्टेक स्त्रोत व सुचीबद्ध माहीती स्त्रोत असतात.

या शिवाय भविष्यकाळात विविध विषयांवर संम्मेलना विषयी माहीती सार—सेवा त्याचप्रमाणे, ऑनलाईन, मानकप्रकाशने, पेटंट स्त्रोत इत्यादी सेवा संदर्भ विभाकडुन केल्या जातात.

**6) वायफाय तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात महत्व :—**

ग्रंथालनयात खुप मोठयाप्रमाणावर उपयोग करण्यात येतो. WI-FI चे महत्व पाहण्याआधी WI-FI तंत्रज्ञान म्हणजे काय ? याबद्दल पाहू WI-FI म्हणजे इंटरनेट वापरण्यासाठी स्वतंत्र स्वच्छंद वापर असा होतो. दोन संगणकामधील दळण—वळणासाठी वापरल्या जाणाऱ्या टेलिकम्युनिकेशनतंत्रज्ञानाचा अभ्यास केला असता दळणवळणासाठी माहीती जलदरीतीने मिळविण्यासाठी व प्रसारीत करण्यासाठी याचा उपयोग करण्यात येतो. जलद गतीने टेलीफोन सेवेबरोबरच डेटांचे (Text Voce Graphics) स्वरूपातील माहीती प्रसारीत करण्यासाठी सुलभ

झाली. संगणकामध्ये इंटरनेटवर सहज उपलब्ध आहे. वायरलेस तंत्रज्ञानाचा उपयोग वायफाय मध्ये होतो. वाय फायचा आपल्याला वापर करावयाचा असेल तर आपल्याकडे प्रॉडक्ट वाय– फाय सर्टिफाईड असणे आवश्यक आहे. म्हणजे प्रस्थापित असणे आवश्यक आहे. व त्यासोबत इंटरसेट , लॅन कार्ड, यु. एस. बी. पोर्ट तसेच सक्षम/राऊटर संगणक/लॅपटॉप मध्ये स्थापीत करणे आवष्यक आहे.

**7) प्रगत तंत्रज्ञानाचे कन्सोर्टियामध्ये महत्व :–**

ग्रंथालयात निधीची कमतरता, तसेच सर्वसाहीत्य कुठल्याही एका ग्रंथालयात मिळविण्यात आलेल्या अडचणी या पाश्वभुमिवर वाचकांची गरज पुर्ण करण्यासाठी वाचन साहीत्याचा सामुहीक उपयोग तसेच ग्रंथालयांमध्ये सहकार्य निर्माण करावे. या संकल्पनांचा उदय झाला ग्रंथालयाचे एकमेकांश्झी सहकार्याने वाचकांच्या गरजा भागविण्यासाठी कन्सोर्टिया हे उपयुक्त साधन आहे. त्याच्या सहकार्याचे प्रगत पुढील प्रमाणे

1) Library Co-Operative
2) Library Resourse Shaving Agreement
3) Library Consortia आणि उच्च अवस्था म्हणजे
4) Library Networking

कन्सोर्टिया संकल्पना अशी की चार ग्रंथालय एकत्रितपणे एका नियतकालीकाच्या चार प्रतींसाठी वर्गणी भरत असतील तर पहील्या प्रतीनंतर प्रत्येक अतिरीक्त प्रतींसाठी ढोबळमानाने 10% ,20%,30% अशी सुट प्रकाशकाकडुन मिळते त्याची वाटणी सारख्या प्रमाणात वाटण्यात येते.

Online – data bases (Full text and Bibliographic वर्गणी संस्था यांचे मिळुन इन्डेस्ट नावाचे कन्सोर्टियम अस्तित्वात आहे. हयामुळे एकत्रितपणे विकत घेवून वाचकांना उपलब्ध करून दिली जाते.

**निष्कर्ष :–**

ग्रंथालयाचा कामात अतिशय महत्वपुर्ण असे योगदान इंटरनेट तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे सुलभ झाले आहे. या तंत्रज्ञानाच्या आधारावर जगातील कोणत्याही क्षेत्राात आवश्यक असणारी माहीती अतिजलद गतीने प्राप्त होत असते. वर्तमान परिस्थीचा विचार केला असता नवनविन कल्पना तंत्रज्ञानाच्या रूपात अस्तित्वात येत राहातील व याचा वापर आपले संशोधक आपल्या शोधासाठी आवश्यक असणारी माहीती आजच्या आधुनिक /तांत्रिक पद्धतीची ग्रंथालये महत्वपुर्ण ठरतील.

## संदर्भ :–

1) पवार, एस.पी. ग्रंथालय व माहीतीशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापुर 2002

2) पारखी, गंगाधर ग्रंथालयशास्त्र परिचय, युनिव्हर्सल प्रकाशन पुणे, 2001

3) फडके, द.ना. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, चौथी आवृत्ती, युनिव्हर्सप्रकाशन पुणे,

4) भट, शरद गो., इलेक्ट्रॉनिक माहीती साधने, अशोक पिंपळापुरे, 2008